# प्रकरण-3

# औद्योगिक पर्यावरण

# (Industrial Environment)

**3.1 भारताच्या आर्थिक विकासातील उद्योग क्षेत्राची भूमिका**

**3.2 औद्योगिक धोरण अधिनियम 1991: उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण**

**3.3 भारतीय उद्योग क्षेत्रासमोरील आव्हाने**

**3.3.1 कामगार आणि रोजगार**

**3.3.2 प्रादेशिक असमतोल**

**3.3.3 वित्तपुरवठा**

**3.3.4 तंत्रज्ञान**

**3.4 सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम: अर्थ आणि भूमिका**

**3.5 भारतीय उद्योग क्षेत्रातील अलीकडील प्रवृत्ती: बहुराष्ट्रीय कंपन्या आणि नवीन धोरणे**

## प्रस्तावना (Introduction)

जागतिक पातळीवर वेगवेगळ्या देशांच्या आर्थिक प्रगतीचा विचार केला असता विकसित, विकसनशील व अल्पविकसित देश अशी वर्गवारी दिसून येते. जगातील विकसित देशांच्या विकासामध्ये त्या देशातील उद्योग क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची दिसून येते. विकसित देशांनी औद्योगिकरणाच्या माध्यमातून मोठी प्रगती साध्य केली आहे. कोणत्याही देशाच्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्राची भूमिका ही अतिशय महत्त्वाची समजली जाते. भारत ही एक विकसनशील अर्थव्यवस्था आहे त्यामुळे भारतात आर्थिक विकास साध्य करण्याच्या दृष्टीने औद्योगीकरणाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. ब्रिटिश राजवटीमध्ये भारत ही व्यापारपेठ म्हणून वापरली जात होती. त्यामध्ये भारतातून कच्चा माल इंग्लंडमध्ये घेऊन जाणे व त्या मालावर औद्योगिक प्रक्रिया करून उत्पादित झालेला अंतिम माल भारतीय बाजारपेठेत आणून विकणे असे एकंदरीत ब्रिटिशांचे धोरण होते. त्यामुळे ब्रिटीश राजवटीमध्ये भारतात औद्योगीकरणाला फारसे पोषक वातावरण नव्हते. ब्रिटिशांच्या या धोरणामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत औद्योगिकदृष्ट्या मागासलेले राष्ट्र म्हणून ओळखला जात होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने 1950 मध्ये आर्थिक नियोजनाला

सुरुवात केली. नियोजनाच्या सुरुवातीच्या काळापासूनच औद्योगीकरणाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले.

### 3.1 भारताच्या आर्थिक विकासातील उद्योग क्षेत्राची भूमिका (Role of Industry in Indian Economic Development)

भारत ही एक विकसनशील अर्थव्यवस्था आहे. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेला शेतीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जाते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने दोन्ही बाजूंनी उद्योग क्षेत्राची भूमिका महत्त्वाची दिसून येते. एक म्हणजे शेती क्षेत्रातील बहुतांश व्यवसायांचा विकास हा उद्योग क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो आणि दुसरे म्हणजे देशाला एक विकसित राष्ट्र बनविण्याच्या दृष्टीने उद्योगक्षेत्राच्या भूमिकेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशाच्या उद्योग क्षेत्राच्या विकासाबरोबरच देशातील इतर विविध क्षेत्रांच्या विकासाला पोषक वातावरण तयार होते. त्यामुळे कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात औद्योगीकरणाला महत्त्वाचे स्थान असते. भारताच्या आर्थिक विकासातील उद्योग क्षेत्राची भूमिका पुढील मुद्द्यांच्या साहृयाने स्पष्ट करता येईल.

**1 शेती क्षेत्राच्या विकासास मदत**

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान अर्थव्यवस्था असल्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने उद्योग क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण दिसून येते. साखर, कापड, चहा, ताग इत्यादी उद्योग शेती क्षेत्रातील उत्पादनाचा कच्चामाल म्हणून वापर करतात. त्यामुळे शेती क्षेत्रातील उत्पादनाला मागणी निर्माण होते. त्याचबरोबर शेतीसाठी लागणारी अवजारे, यंत्रे, रासायनिक खते, बी-बियाणे, कीटकनाशके इत्यादींचा पुरवठा उद्योग क्षेत्राकडून शेती क्षेत्राला केला जातो. अशाप्रकारे उद्योगक्षेत्र शेती क्षेत्राच्या विकासास हातभार लावते.

**2 उपभोग्य वस्तूंची निर्मिती**

देशाची लोकसंख्या दिवसेंदिवस वेगाने वाढत आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येबरोबरच उपभोग्य वस्तूंची मागणी देखील वाढत चालली आहे. देशाच्या उद्योग क्षेत्राकडून कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्यापासून अंतिम उपभोग्य वस्तूंची निर्मिती केली जाते व लोकांना उपभोगासाठी उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे देशातील लोकांच्या उपभोगाची गरज या क्षेत्राकडून पूर्ण केली जाते.

**3 नैसर्गिक साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर शक्य**

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात विविध प्रकारची नैसर्गिक साधन सामग्री उपलब्ध आहे. या उपलब्ध असलेल्या कच्च्या स्वरुपातील नैसर्गिक साधनसामग्रीचा उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून कार्यक्षम वापर करता येतो. औद्योगिकरणामुळे नैसर्गिक साधनांचा उत्पादन कार्यात सहभाग करून घेता येतो. विकसनशील देशात नैसर्गिक साधन सामग्री न वापरता मोठ्या प्रमाणात तशीच पडून असते. उद्योग क्षेत्रामुळे नैसर्गिक साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर करून आर्थिक विकासास चालना देता येते.

**4 रोजगार पातळीत वाढ**

उद्योग क्षेत्राच्या विकासामुळे देशात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण होतात. उद्योग क्षेत्राच्या विकासाबरोबरच शेती क्षेत्र व सेवा क्षेत्रांचा देखील विकास होत जातो व अधिकाधिक रोजगार निर्माण होतो. देशातील संघटित व असंघटित क्षेत्रातील उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण झालेल्या आहेत. देशात रोजगार संधी निर्माण करून बेकारीची समस्या कमी करण्यात उद्योग क्षेत्राची भूमिका महत्त्वाची दिसून येते.

**5 राष्ट्रीय उत्पन्नात वाढ**

देशाचे राष्ट्रीय उत्पन्न मोजताना एका आर्थिक वर्षातील देशातील सर्व क्षेत्रातील उत्पादित अंतिम वस्तू व सेवांचे बाजारमूल्य मोजले जाते. देशातील उद्योग क्षेत्रामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होताना दिसून येते. 1950-51 मध्ये देशाच्या जीडीपी मध्ये उद्योग क्षेत्राचा वाटा 16.2 टक्के होता, त्यात वाढ होऊन 2017-18 मध्ये तो 31.2 टक्के झाला. यावरून उद्योग क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा वाढत चालल्याचे दिसून येते.

**6 देशाच्या निर्यातीत महत्त्वाचा वाटा**

आंतरराष्ट्रीय पातळीवर शेती क्षेत्रात उत्पादित होणाऱ्या प्राथमिक उत्पादनांना असणारी मागणी दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे देशाच्या निर्यातीत वाढ घडवून आणायची असेल तर उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून निर्यातीत विविधता आणावी लागत आहे. भारताच्या उद्योग क्षेत्रातून तयार होणाऱ्या उत्पादनांची विविध देशांना निर्यात केली जात आहे. निर्यातीत वाढ झाल्यास देशाच्या व्यवहारतोलातील तूट कमी होण्यास मदत होते व विकसनशील देशांच्या निर्यातीच्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्र महत्त्वाचे दिसून येते.

**7 शेतीक्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्येचा भार कमी**

देशात उद्योगक्षेत्राचा पुरेसा विकास न झाल्यामुळे आणि बेरोजगारीमुळे शेतीक्षेत्रात लोकसंख्येची मोठी दाटी निर्माण झाली आहे. त्यामुळे छुप्या बेकारीचे प्रमाण ही मोठ्या प्रमाणात दिसून येते. भारतातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासाबरोबरच नव्याने रोजगार संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे शेती क्षेत्रात अतिरिक्त असणारी लोकसंख्या रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरित होत आहे व त्यातून शेतीक्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्येची दाटी कमी होऊन शेतीची उत्पादकता देखील वाढण्यास मदत झाली आहे.

**8 बाजारपेठेचा विस्तार**

उद्योग क्षेत्राच्या विकासाबरोबरच बाजारपेठेचा विस्तार व विकास होण्यास मदत होते. उद्योग क्षेत्रातून विविध प्रकारच्या वस्तूंची निर्मिती केली जाते त्यातून बाजाराचा विस्तार होत जातो. उद्योगांसाठी कच्चामाल पुरविणाऱ्या बाजारपेठा विकसित होत जातात. उद्योग क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या माध्यमातून लोकांच्या उत्पन्नात वाढ होते आणि त्यातून विविध वस्तू व सेवांना मागणी निर्माण होत जाते.

**9 सरकारी उत्पन्नात वाढ**

उद्योग क्षेत्र व त्यातून उत्पादित होणाऱ्या विविध प्रकारच्या उत्पादनांवर सरकारकडून आकारण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करापासून सरकारी उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होते. कंपनी कर, उत्पादन कर, वस्तू व सेवा कर यासारख्या करापासून सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होतो व त्या उत्पन्नातून सरकारला आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या योजना व प्रकल्प कार्यान्वित करता येतात.

**10 प्रादेशिक समतोल साधण्यास मदत**

देशातील काही प्रदेश विकासात अग्रेसर आहेत तर काही प्रदेश माग असलेले दिसून येतात. उद्योगक्षेत्राच्या सहाय्याने प्रादेशिक समतोल निर्माण करता येतो. मागासलेल्या प्रदेशात सरकार कडून नवीन उद्योग उभारणीसाठी वेगवेगळ्या प्रकारे सवलती व सुविधा देऊन अशा प्रदेशांच्या विकासासाठी प्रयत्न केला जात आहे.

**11 देशातील दारिद्र्य निवारण**

भारतामध्ये दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण मोठे आहे. औद्योगिकरणाच्या माध्यमातून देशातील लोकांना रोजगार उपलब्ध करून त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला जात आहे. औद्योगिकरण करून दारिद्र्य निर्मूलन करण्यावर सरकारकडून भर देण्यात येत आहे. त्यामुळे देशातील दारिद्र्य निर्मूलनाच्या दृष्टिकोनातून उद्योग क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे.

**12 आंतरराष्ट्रीय नावलौकिक**

देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने आणि देशाला आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळवून देण्याच्या दृष्टीने उद्योग क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर एखादा देश हा गरीब किंवा विकसनशील आहे असे म्हणणे त्या देशाचे दरडोई उत्पन्न कमी आहे हे निश्चित करते. अशा वेळेस देशाला नावलौकिक मिळवून देण्यासाठी देशातील उपलब्ध सर्व साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर करणे आवश्यक ठरते व उद्योग क्षेत्राच्या विकासातून हे साध्य करता येते.

वरील बाबीं व्यतिरिक्त आर्थिक विषमतेत घट, तांत्रिक बदलांचा वापर करणे, लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करणे, गुंतवणुकीला चालना देणे इत्यादी बाबतीत देखील उद्योग क्षेत्राची भूमिका महत्त्वाची दिसून येते.

**3.2 औद्योगिक धोरण अधिनियम 1991: उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण (Industrial Policy Resolution,1991- Liberalization, Privatization and Globalization (LPG)**

देशाचे औद्योगिक धोरण म्हणजे सरकारने देशाच्या औद्योगिक विकासासाठी तयार केलेली व्यूहरचना होय. देशाच्या औद्योगिक धोरणामध्ये औद्योगिक क्षेत्रासंबंधीचे नियम, नियंत्रणाची साधने व पद्धती, तत्वे, गुंतवणूक, औद्योगिक वित्त पुरवठा, कामगारांचे प्रश्न, उद्योगांचे मालकी हक्क, औद्योगिक सवलती व सुविधा, कायदे, परकीय सहाय्य, जकात धोरण इत्यादी बाबींचा समावेश केला जातो.

**औद्योगिक धोरण अधिनियम 1991 (Industrial Policy Resolution 1991)**

श्री पी. व्ही. नरसिंहराव यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर लगेचच त्या सरकारने अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले या धोरणात्मक निर्णयांनाच एकत्रितपणे “नवीन आर्थिक सुधारणा” असे म्हणतात. या नवीन आर्थिक सुधारणा मधील महत्वाचा भाग म्हणून 24 जुलै 1991 रोजी श्री पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने आपले नवे औद्योगिक धोरण जाहीर केले. या धोरणाच्या माध्यमातून पूर्वीच्या औद्योगिक धोरणात मूलभूत व आवश्यक बदल करण्यात आले व त्यामुळे भारताच्या औद्योगिक क्षेत्रात एका नव्या पर्वाला सुरुवात झाली.

**अ) 1991 च्या औद्योगिक धोरणाची उद्दिष्टे**

खालील उद्दिष्टे साध्य करण्याच्या हेतूने 1991 च्या औद्योगिक धोरणाची आखणी करण्यात आली होती.

1 सार्वजनिक क्षेत्राची भूमिका कमी करणे.

2 औद्योगिक परवाना पद्धती शिथिल करणे.

3 प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीवर निर्बंध दूर करणे.

4 उदारीकरणाच्या माध्यमातून जागतिक अर्थव्यवस्थेशी सांगड घालणे.

5 खाजगीकरण व निर्गुंतवणूक धोरण लागू करणे.

6 तंत्रज्ञानाला मुक्त प्रवेश प्रदान करणे.

7 सार्वजनिक आजारी उद्योग बंद करणे.

8 मक्तेदारी व निबंधात्मक व्यापार व्यवहार कायद्याच्या नियंत्रणापासून उद्योग मुक्त करणे.

**ब) 1991 च्या औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये**

24 जुलै, 1991 रोजी जाहीर केलेल्या औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

**1 सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती कमी**

भारतीय अर्थव्यवस्था ही एक मिश्र अर्थव्यवस्था आहे. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांचे सहअस्तित्व दिसून येते. 1956 च्या औद्योगिक धोरणानुसार देशातील सर्व महत्त्वाचे उद्योग सरकारच्या अधिकारातच असावेत अशी भूमिका होती, परंतु ही भूमिका 1991 च्या औद्योगिक धोरणात सोडण्यात आली व सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती कमी करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. कारण नियोजन काळात सार्वजनिक क्षेत्राकडून ज्या अपेक्षा केल्या होत्या त्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. म्हणजेच सार्वजनिक क्षेत्र देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेत अपयशी ठरल्याची अप्रत्यक्ष कबुली या 1991 च्या औद्योगिक धोरणाने दिली होती. 1991 च्या औद्योगिक धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित उद्योगांची संख्या 8 पर्यंत कमी करण्यात आली. 1991 ते 2015-16 या काळात सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती कमी करून सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित उद्योगांची संख्या 3 पर्यंत कमी करण्यात आली. त्यामुळे अणुउर्जा, अणुखनिज आणि रेल्वे ही तीनच क्षेत्रे सरकारी क्षेत्रासाठी आरक्षित ठेवण्यात आली. परंतु 2015 पासून अणुखनिज क्षेत्र आणि रेल्वेमधील पायाभूत सुविधा या खाजगी क्षेत्राला खुल्या करण्याची परवानगी देण्यात आली. त्यामुळे सध्या केवळ दोनच क्षेत्रे सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित आहेत. ती म्हणजे अणुउर्जा आणि रेल्वे. म्हणजेच सध्या वरील दोन क्षेत्र वगळता इतर कोणत्याही क्षेत्रात खाजगी क्षेत्र प्रवेश करू शकते.

**2 औद्योगिक परवाना धोरणाचे उदारीकरण**

देशातील उद्योग व्यवसायावर प्रशासकीय नियंत्रण राहावे हा औद्योगिक परवाना धोरणाचा मुख्य आधार होता, परंतु या औद्योगिक परवाना धोरणाच्या माध्यमातून नोकरशाहीचा अनावश्यक हस्तक्षेप उद्योगधंद्यात वाढत गेला व त्यामुळे देशातील उद्योग क्षेत्राच्या विकासात अडथळे येत होते. त्याबरोबरच परवाना धोरणाच्या जाचक अटींमुळे औद्योगिक विकासात मर्यादा पडत होत्या. त्यामुळे औद्योगिक विकासासाठी औद्योगिक परवाना धोरणात मूलभूत बदल स्वीकारण्यात आले. या 1991 च्या औद्योगिक धोरणानुसार संरक्षण विषयक, पर्यावरण विषयक व सामाजिक दृष्ट्या घातक ठरू शकतील असे 18 उद्योग सोडून इतर सर्व उद्योग परवाना मुक्त करण्यात आले. म्हणजेच या धोरणाने जवळ-जवळ 85 टक्के औद्योगिक क्षेत्र परवाना मुक्त केले. सुरुवातीला केवळ 18 उद्योगांसाठीच औद्योगिक परवान्याची अट होती. त्यानंतर ही संख्या क्रमाक्रमाने कमी करण्यात आली. सध्या केवळ 5 प्रकारच्या औद्योगिक क्षेत्रासाठी औद्योगिक परवाना आवश्यक आहे. त्यामध्ये,

1 तंबाखू सिगारेट विडी बनवणारे ऊद्योग.

2 मद्यार्क पेयांचे उत्पादन बनवणारे उद्योग.

3 इलेक्ट्रॉनिक्स एरोस्पेस आणि सर्व प्रकारची संरक्षण साधन सामग्री.

4 ज्वलनशील उद्योग आगपेटी स्फोटके.

5 घातक रसायने उद्योग, यांचा समावेश होतो.

**3 MRTP कायद्यातील बदल**

अर्थव्यवस्थेतील आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण टाळणे, उद्योग क्षेत्रातील मक्तेदारी टाळणे तसेच व्यापारातील बंधने दूर करण्यासाठी 1969 मध्ये MRTP कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार मोठ्या उद्योगांना नवीन गुंतवणूक करण्याबाबत मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आले होते. 100 कोटींपेक्षा जास्त उलाढाल असलेले उद्योग MRTP कायद्यांतर्गत मोडत असत. 1991 च्या नवीन आर्थिक सुधारणा अंतर्गत MRTP कायद्यात सुधारणा करण्यात आल्या व 1991 च्या औद्योगिक धोरणा अंतर्गत उद्योगांसाठीची 100 कोटींची मर्यादा रद्द करण्यात आली. 2002 मध्ये MRTP कायदा रद्द करण्यात येऊन, त्याऐवजी Competition Act करण्यात आला. Competition Act 2002 नुसार उद्योगातील मक्तेदारी टाळण्याऐवजी उद्योगात स्पर्धा क्षमता निर्माण करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. 2007 मध्ये Competition Act मध्ये सुधारणा करण्यात आली व 20 मे 2009 ला Competition Commission of India ची स्थापना करण्यात आली.

**4 परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक**

1991 च्या औद्योगिक धोरणानुसार परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी भारतातील औद्योगिक कंपन्यांच्या समभागात 51 टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुंतवणूक करण्यास परकीय गुंतवणूकदारांना मान्यता देण्यात आली. तसेच बहुतांश उद्योगात स्वयंचलित मार्गाने परकीय गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात आली. भारत सरकारने 2000 मध्ये SEZ धोरण जाहीर केले व त्यानुसार शुल्क विरहित परकीय क्षेत्रे उभारून परकीय गुंतवणुकीस चालना देण्यात आली. भारतातील प्रमुख क्षेत्रातील उद्योगांना मोठ्या प्रमाणात भांडवल व प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे हा त्या पाठीमागे उद्देश होता.

**5 FERA कायद्यात बदल**

1973 मध्ये FERA कायदा करण्यात आला. या कायद्यात परकीय गुंतवणुकीसंबंधी अनेक जाचक अटी होत्या. परकीय गुंतवणुकीस जाचक ठरत असलेल्या FERA कायद्यात सुधारणा करण्याचा व परकीय गुंतवणुकीस चालना देण्याचा निर्णय 1991 मध्ये घेण्यात आला. त्या अनुषंगाने 1999 मध्ये FERA फायद्याऐवजी तुलनेने शिथिल असलेला FEMA कायदा करण्यात आला. FEMA कायद्यानुसार परकीय गुंतवणुकीच्या नियंत्रणाऐवजी व्यवस्थापनावर भर देण्याचे ठरविण्यात आले.

**6 औद्योगिक स्थाननिश्चिती**

1991 च्या औद्योगिक धोरणात प्रदूषण करणाऱ्या व पर्यावरणदृष्ट्या हानिकारक उद्योगांना 1 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहराच्या 25 किलो मीटर पेक्षा दूर स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली. तर कोणतेही प्रदूषण न करणाऱ्या उद्योगांना शहराच्या 25 किलोमीटर परिसरात उद्योग स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

**नवीन आर्थिक सुधारणा: उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण (New Economic Reforms: Liberalization, Privatization and Globalization (LPG)**

1991 च्या आर्थिक संकटाने भारतीय अर्थव्यवस्थेतील समग्रलक्षी पातळीवरील घटकांमधील संरचनात्मक असंतुलनाची जाणीव करून दिली. त्यामुळे या समग्रलक्षी पातळीवरील घटकांमध्ये संरचनात्मक बदल केल्याशिवाय हे संकट दूर होणार नव्हतं. 21 जून 1991 रोजी पी. व्ही. नरसिंहराव यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर लगेचच तत्कालीन सरकारने अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडवून आणण्यासाठी जे धोरणात्मक निर्णय घेतले त्यांना एकत्रितरित्या “आर्थिक सुधारणा” असे

संबोधण्यात आले. या आर्थिक सुधारणांचा मध्यवर्ती गाभा म्हणजेच उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण होय, किंबहुना उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण घडवून आणण्यासाठी सरकारने घेतलेले धोरणात्मक निर्णय म्हणजेच आर्थिक सुधारणा होय.

नवीन आर्थिक सुधारणांमध्ये पुढील सुधारणांचा समावेश होतो.

**1 उदारीकरण किंवा शिथिलीकरण (Liberalization)**

भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेची मुक्त अर्थव्यवस्थेच्या दिशेने चालू असलेली वाटचाल ही उदारीकरणाच्या संकल्पनेवरच आधारित आहे. जागतिकीकरण हे भारतीय अर्थव्यवस्थेचे लक्ष आहे आणि हे लक्ष्य गाठण्यासाठी उदारीकरण ही एक दिशा आहे. उदारीकरणाच्या या प्रक्रियेमध्ये सरकारची भूमिका व बंधने कमी करून खाजगी क्षेत्राला अधिकाधिक वाव मिळवून देण्याचे तत्व स्वीकारण्यात आले.

**व्याख्या:**

"उदारीकरण म्हणजे सरकारने अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवर (गुंतवणूक, उत्पादन, आयात व निर्यात इत्यादी) टाकलेली अनावश्यक बंधने कमी करण्याची व काढून टाकण्याची प्रक्रिया होय."

विविध प्रकारची सामाजिक व आर्थिक उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारने सुरुवातीपासूनच अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांवर अनेक बंधने टाकलेली होती. उदाहरणार्थ औद्‌योगिक परवाना पद्‌धती, सार्वजनिक क्षेत्र आरक्षण धोरण, लघुउद्‌योग क्षेत्रासाठीचे आरक्षण धोरण, आयात निर्यातीवरील बंधने, उद्‌योगांवर बंधने टाकणारा MRTP Act इत्यादी प्रकारची बंधने शिथिल करणे किंवा काढून टाकणे म्हणजे उदारीकरण होय.

**उदारीकरणाची उद्‌दिष्टे**

उदारीकरणाच्या प्रक्रियेच्या माध्यमातून पुढील उद्‌दिष्टे साध्य करण्याचे ठरविण्यात आले होते.

1 सार्वजनिक क्षेत्राची अर्थव्यवस्थेतील भूमिका कमी करणे.

2 परकीय प्रगत तंत्रज्ञान व परकीय गुंतवणूक आकर्षित करणे.

3 औद्‌योगिक क्षेत्राची स्पर्धा क्षमता वाढविणे.

4 जागतिकीकरणाचे उद्‌दिष्ट गाठणे.

5 देशाच्या निर्यातीत वाढ घडवून आणणे.

**उदारीकरणाच्या उपाययोजना**

उदारीकरणाच्या माध्यमातून पुढील उपाययोजना करण्यात आल्या.

**1 औद्योगिक परवाना पद्धतीत बदल**

सामाजिक दृष्ट्या व संरक्षण विषयक महत्वाचे 18 उद्योग वगळता इतर सर्व औद्योगिक क्षेत्र परवाना मुक्त करण्यात आले. ही संख्या क्रमाक्रमाने कमी करण्यात आली व सध्या केवळ 5 उद्योगांसाठीच परवाना आवश्यक आहे.

**2 सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती कमी केली**

1991 च्या धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित उद्योगांची संख्या 8 पर्यंत कमी करण्यात आली. कालांतराने ही संख्या आणखी कमी करण्यात येऊन सध्या केवळ अनु उर्जा व रेल्वे वाहतूक ही दोनच क्षेत्रे सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित आहेत.

3 लघुउद्योगांच्या उत्पादनासाठी आरक्षित असलेल्या अनेक वस्तू अनारक्षित करण्यात आल्या.

4 MRTP कायद्यात सुधारणा करून सरकारी संमतीशिवाय 100 कोटींपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल असलेल्या कंपन्यांना नवीन गुंतवणूक, प्रकल्प करण्याची परवानगी देण्यात आली.

5 अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांमध्ये 26 टक्क्यांपासून 100 टक्क्यांपर्यंत परकीय गुंतवणुकीस परवानगी देण्यात आली.

6 आयात निर्यातीबाबत उदार धोरण स्वीकारण्यात आले.

7 बँक व्यवस्था खाजगी क्षेत्रात खुली करण्यात आली.

8 सुरुवातीला व्यापार खात्यावर व नंतर चालू खात्यावर रुपया परिवर्तनीय करण्यात आला.

9 FERA कायदा शिथिल करून FEMA कायदा करण्यात आला.

10 विविध पायाभूत व सेवा क्षेत्रे खाजगी तसेच परकीय गुंतवणुकीसाठी खुली करण्यात आली.

**2 खाजगीकरण (Privatization)**

खाजगीकरण ही एक प्रक्रिया आहे ज्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित क्षेत्रे खाजगी क्षेत्रासाठी खुली करणे, सार्वजनिक उपक्रमांच्या मालकीचे खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरण करणे यांचा समावेश होतो. असे हस्तांतरण अंशतः व पूर्णतः केले जाऊ शकते. अंशतः हस्तांतरण केल्यास सार्वजनिक क्षेत्राची मालकी व खाजगी क्षेत्राचे व्यवस्थापन असा संयोग तयार होतो. तर मालकीचे पूर्णतः हस्तांतरण केल्यास ते पूर्ण खाजगीकरण होते.

**व्याख्या**:

"खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्राची मालकी अंशतः किंवा पूर्णतः खाजगी क्षेत्राकडे हस्तांतरित करणे होय."

मालकी हक्काच्या हस्तांतरणासाठी सरकार निर्गुंतवणूक धोरणाचा अवलंब करते.

**खाजगीकरणाची आवश्यकता**

नियोजनाच्या सुरुवातीपासूनच देशातील महत्त्वाचे सर्व उद्योग सरकारच्या अधिकारात असावेत अशी भुमिका भारत सरकारने स्वीकारली होती. परंतु आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सार्वजनिक क्षेत्राकडून ज्या अपेक्षा केल्या होत्या त्या पूर्ण होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे 1991 च्या औद्योगिक धोरणानुसार सरकारची ही भूमिका सोडण्यात आली व सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती कमी करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले. त्याचा परिणाम म्हणून निर्गुंतवणूक धोरणाच्या माध्यमातून सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करण्यात आले. सार्वजनिक क्षेत्र अपयशी ठरत असल्यामुळे किंवा त्यांच्या उत्पादनक्षमतेचा पुरेपूर वापर करण्यात आला नाही म्हणून आणि भारताने आंतरराष्ट्रीय बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडे कर्जाची मागणी केली असता खाजगीकरणाची अट घातल्यामुळे भारत सरकारला खाजगीकरण करणे भाग पडले.

**3 जागतिकीकरण (Globalization)**

1991 चे नवीन आर्थिक सुधारणांचे अंतिम लक्ष जागतिकीकरण होते. जागतिकीकरण घडवून आणण्यासाठी दिशा देण्याचे काम उदारीकरणाच्या धोरणाच्या माध्यमातून करण्यात आले व जागतिकीकरणाचे लक्ष गाठण्यासाठी चा मार्ग खाजगीकरणाच्या माध्यमातून तयार करण्यात आला. त्यामुळे उदारीकरण ही दिशा (Direction) खाजगीकरण हा मार्ग (Route) आणि जागतिकीकरण हे लक्ष (Goal) असा प्रवाह दिसून येतो.

**व्याख्या:**

"जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेचे एकत्रीकरण होय. म्हणजेच जागतिकीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण केली जाते."

जागतिकीकरणाच्या प्रक्रिये अंतर्गत विविध देशांमध्ये गुंतवणूक, उत्पादन, वस्तू व सेवा, माहिती व तंत्रज्ञान इत्यादींचा प्रवाह सुरू होतो. हा प्रवाह सुरळीत होण्यासाठी सरकारी प्रतिबंध मर्यादित करणे आवश्यक असते. जागतिकीकरणामुळे देशादेशांत परस्परावलंबन निर्माण होते. जागतिकीकरणामुळे कोणत्याही उत्पादकाला जगात कोठेही कमीत कमी उत्पादन खर्चात उत्पादन करता येते. त्यासाठी कोणत्याही देशातून स्वस्तात व्यवस्थापकीय साधने व कच्चामाल मिळविता

येतो व तयार झालेल्या वस्तू व सेवा जगात कोणत्याही देशात विकता येतात. परंतु कोणत्याही देशाच्या सरकारने बंधने न घातल्यास हे शक्य होते यालाच जागतिकीकरण म्हणतात.

जागतिकीकरणाची प्रक्रिया पुढील चार महत्वाच्या घटकांवर अवलंबून असते.

1 तंत्रज्ञानाचा मुक्त प्रवाह.

2 भांडवलाचा मुक्त प्रवाह.

3 वस्तू व सेवांचा मुक्त प्रवाह.

4 श्रमाचा मुक्त प्रवाह.

## 3.3 भारतीय उद्योगासमोरील आव्हाने (Challenges to Indian Industry)

भारताच्या आर्थिक विकासात उद्योग क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. मात्र उद्योग क्षेत्रांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

### 3.3.1 कामगार आणि रोजगार (Labour and Employment)

भारताच्या आर्थिक विकासात उद्योग क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. 2017-18 मध्ये देशाच्या GDP मध्ये उद्योग क्षेत्राचा वाटा 31.2 टक्के होता. देशातील कार्यकारी लोकसंख्येला उद्योग क्षेत्रातून पुरवलेली रोजगार क्षमता विचारात घेतली असता या क्षेत्राचे महत्व लक्षात येते. 2016 मध्ये देशातील एकूण रोजगाराच्या 25 टक्के रोजगार उद्योग क्षेत्रांमध्ये निर्माण झाला होता. आधुनिक काळातील स्पर्धेचे बदलते स्वरूप, मागणीचे विविधता, तंत्रज्ञानातील बदल, वाढती बेकारी, कामगारांची उपलब्धता व कामगार विषयक समस्या अशा अनेक बाबींमुळे भारतातील उद्योग क्षेत्राला अनेक समस्या व आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

**1 आधुनिकीकरण किंवा वाजवीकरण**

उद्योगांना स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उत्पादन खर्च कमीत कमी करणे आवश्यक असते. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी नवीन व आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा लागतो. उत्पादन तंत्रात सुधारणा करून उत्पादनाचा दर्जा व गुणवत्ता यामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न उद्योजक करतात. या प्रयत्नांना आधुनिकीकरण किंवा वाजवीकरण म्हणतात. उद्योगांमध्ये उद्योजक जेव्हा आधुनिकीकरणाचा मार्ग स्वीकारतात तेव्हा श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर कमी केला जातो व भांडवलप्रधान तंत्राचा वापर म्हणजेच यंत्राचा वापर वाढतो. उत्पादन कार्यात यंत्राचा वापर वाढल्याने बऱ्याच कामगारांना बेकर व्हावे लागते. म्हणजेच आधुनिकीकरणामुळे कामगारांच्या बेरोजगारीत वाढ होते. त्यामुळे सहाजिकच उद्योजकांच्या अशा आधुनिकीकरणाला कामगारांकडून विरोध केला जातो.

जेव्हा उद्योजक कामगारांचा विरोध मोडून आधुनिकीकरण करतात तेव्हा कामगार संघटना व मालक वर्ग यांच्यात औद्योगिक कलह निर्माण होतात.

**2 कुशल कामगारांची कमतरता व वाढती बेकारी**

भारतात एका बाजूला मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आहे आणि दुसऱ्या बाजूला उद्योग क्षेत्राला कुशल मनुष्यबळाची कमतरता आहे. उद्योग क्षेत्रात दिवसेंदिवस आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व आवश्यकता वाढत चालली आहे. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराबरोबरच तांत्रिक कौशल्य असणाऱ्या कामगारांना रोजगार संधी देखील निर्माण होत आहेत. परंतु अकुशल व अर्ध कुशल कामगारांच्या तुलनेत कुशल श्रमिकांची कमतरता आहे. त्यामुळे उद्योगांना कुशल श्रमिक उपलब्ध करणे हे आव्हान आहे.

**3 नवीन कामगारांच्या प्रशिक्षणा वरील खर्च**

उद्योग क्षेत्रातील उत्पादनाचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत चालले आहे. उद्योग क्षेत्राचे आधुनिकीकरण होत आहे. श्रमप्रधान उत्पादन तंत्राकडून भांडवलप्रधान उत्पादन तंत्राकडे उद्योग क्षेत्र वेगाने जात आहे. त्यामुळे औद्योगिकरणाच्या प्रक्रियेबरोबरच उच्च शिक्षण क्षेत्रात देखील बदल होणे आवश्यक आहे. परंतु देशातील उच्च शिक्षण संस्थांकडून दिले जाणारे शिक्षण व उद्योग क्षेत्रातील रोजगार संधी यांचा ताळमेळ घातला जात नाही. उच्च शिक्षण संस्थांनी उद्योग क्षेत्रातील रोजगार संधी ओळखून शिक्षण पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. मात्र असे होत नसल्याने उद्योगांना प्रशिक्षित श्रमिक उपलब्ध होत नाहीत. कामगारांना कामावर घेऊन त्यांना प्रशिक्षित करावे लागते. प्रशिक्षण काळात त्यांना वेतन द्यावे लागते. त्याबरोबरच प्रशिक्षण कार्यक्रमावर मोठा खर्च करावा लागतो.

**4 कामगारांच्या अनुपस्थिती**

भारतातील औद्योगिक कामगारांमध्ये दैनंदिन कामावर गैरहजर राहण्याचे प्रमाण जास्त आहे. बहुधा कामगार पूर्वपरवानगी न घेता गैरहजर राहतात. त्यामुळे औद्योगिक उत्पादन प्रक्रियेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो. म्हणून कामगारांची अनुपस्थिती हे देखील भारतीय उद्योगासमोरील आव्हान आहे.

**5 गैरवर्तन व बेशिस्त**

बहुतांश वेळा कामगारांच्या गैरवर्तनाचा व बेशिस्तीचा अनुभव उद्योजकांना येतो. कामगारांची बेशिस्त वागणूक व गैरवर्तन यामुळे औद्योगिक वातावरण बिघडते. त्याचा उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. कामाच्या ठिकाणी पुरुष कर्मचाऱ्याचे स्त्री कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन हा अतिशय

संवेदनशील प्रश्न उपस्थित होतो. अशा सर्व गोष्टींना नियंत्रणात ठेवून उत्पादन सुरळीतपणे चालू ठेवण्याचे आव्हान उद्योग क्षेत्रासमोर आहे.

**6 औद्योगिक कलह**

प्रामुख्याने उद्योजक व कामगार या दोन वर्गांमध्ये काम, कामाच्या सेवाशर्ती, वातावरण पगार, बोनस इत्यादी वरून जे विवाद होतात त्यास औद्योगिक कलह असे म्हणतात. औद्योगिक कलहामुळे संप व टाळेबंदी यासारख्या समस्या निर्माण होतात. या दोन्हीमुळे औद्योगिक उत्पादनात घट घडून येते व औद्योगिक वातावरण बिघडते. त्यामुळे औद्योगिक कलह होऊ नये व झाल्यास शांततामय मार्गाने कलह मिटावा यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याचे आव्हान उद्योग क्षेत्रासमोर आहे.

**7 कंत्राटी कामगार**

देशातील सर्वच क्षेत्रात दिवसेंदिवस नियमित कामगारांऐवजी कंत्राटी कामगारांचे प्रमाण वाढत चालले आहे. व्यवसायसंस्था असे कंत्राटी कामगार पुरवणाऱ्या संस्थेकडून कामगार कामावर घेतात. त्यामुळे अशा कामगारांची जबाबदारी व्यवसायसंस्थाकडे नसून कामगार पुरविणाऱ्या संस्थांकडे असते. त्यामुळे अशा कामगारांकडून चांगले योगदान घेण्याचे आव्हान उद्योगां समोर उभे राहते.

**8 कामगारांमधील नोकरी बदलण्याचे प्रवृत्ती**

औद्योगिक कामगारांमध्ये एकाच ठिकाणी कायमस्वरूपी नोकरी करण्यापेक्षा नोकरी बदलण्याचे प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अधिक वेतन व इतर आकर्षक लाभ मिळविण्यासाठी औद्योगिक कामगारांमध्ये ठराविक काळानंतर नोकरी बदलण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे नवीन कामगारांना कामावर घेऊन त्यांना टिकवून ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

**9 कामगार संघटनांचे बाहय नेतृत्व**

भारतातील बहुतेक कामगार संघटनांचे नेतृत्व राजकीय पक्षांच्या व्यक्तींकडे आहे. कामगार संघटनांचे नेतृत्व राजकीय व्यक्तीकडे असल्याने विधायक कार्याऐवजी विघातक कार्यावर भर दिला जातो. परिणामी उद्योजक व कामगार वर्ग यांच्यातील मतभेद विकोपाला जाऊन औद्योगिक कलह निर्माण होतो. त्यामुळे अशा कामगार संघटनांच्या नेत्यांशी जुळवून घेऊन उत्पादन कार्य सुरळीतपणे चालविण्याचे आव्हान उद्योग क्षेत्रासमोर आहे.

### 3.3.2 प्रादेशिक असमतोल (Regional Imbalance)

प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत अस्तित्वात आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर काही देश प्रगत आहेत तर काही देश विकासाच्या बाबतीत मागे आहेत. देश पातळीवर विचार केला असता देशातील काही प्रमुख राज्य उदाहरणार्थ महाराष्ट्र, गुजरात, पंजाब विकासाच्या बाबतीत आघाडीवर आहेत तर काही राज्य विकासाच्या बाबतीत मागे आहेत, त्याबरोबरच राज्य पातळीवर देखील सर्व विभागांचा समान प्रमाणात विकास झालेला नाही.

देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने विचार केला असता देशात समतोल औद्योगिक विकास घडून येणे अनेक दृष्टीने महत्त्वाची आहे. परंतु भारतामध्ये उद्योगांच्या बाबतीत प्रादेशिक असमतोल दिसून येतो. देशातील काही प्रमुख राज्यांमध्ये उद्योगांचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाले आहे, तर काही राज्यांमध्ये उद्योगांचा विस्तार कमी झालेला आहे. भारताने नियोजन काळात औद्योगिक विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारून देखील उद्योगांचे विकेंद्रीकरण आवश्यक तेवढे झाले नाही.

**प्रादेशिक असमतोलाबाबतची आव्हाने**

भारतामध्ये प्रादेशिक असमतोल व प्रादेशिक औद्योगिक असमतोल ही वस्तुस्थिती आहे. अशा असमतोलामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर अनेक आव्हाने व समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1 मागासलेल्या भागात उद्योगांचा विकास करणे**

देशातील मागासलेल्या राज्यांना विकासाच्या बाबतीत पुढे आणण्यासाठी तेथे उद्योगांचा विकास करण्याचे मोठे आव्हान देशापुढे आहे. मागास राज्यात उद्योगांची वाढ करण्यासाठी त्या भागात उपलब्ध होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग तेथेच निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. मागास भागात सार्वजनिक उद्योग उभारणीसाठी प्रयत्न करणे तसेच खासगी उद्योजकांना विविध सवलती देऊन अशा भागात उद्योग स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**2 संतुलित विकासाची व्यूहरचना**

देशाची एकंदरीत विकासाची व्यूहरचना ही संतुलित विकासावर भर देणारी असली पाहिजे. मागासलेल्या राज्यांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. विकसित देशांच्या विकासाला बाधा न आणता मागासलेल्या प्रदेशांचा विकास साध्य करून आर्थिक विकासाची फळे सर्व सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे आव्हान अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झाले आहे.

**3 बेरोजगारी व दारिद्र्य निर्मूलन**

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील महत्त्वाच्या समस्यांमध्ये बेकारी व दारिद्र्य या समस्यांचा समावेश होतो. रोजगार संधीच्या अभावामुळे बेरोजगारी निर्माण झाली आहे आणि त्याचा परिणाम म्हणून दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. ज्या भागात औद्योगीकरण कमी आहे त्या भागात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे समतोल प्रादेशिक विकास साध्य करून दारिद्र्य व बेरोजगारी चे निर्मूलन करण्याचे आव्हान भारतापुढे आहे.

**4 राष्ट्रीय ऐक्य जोपासणे**

देशाच्या काही भागात उद्योगांचे केंद्रीकरण व काही राज्यांमध्ये उद्योगांचा अभाव अशा प्रकारच्या प्रादेशिक औद्योगिक असमतोलामुळे राज्याराज्यांमधील वैमनस्य वाढवून त्याचा राष्ट्रीय एकात्मतेवर अनिष्ट परिणाम होत आहे. त्यामुळे समतोल प्रादेशिक औद्योगिक विकास साध्य करून राष्ट्रीय ऐक्य भावना जोपासण्याचे आव्हान देशासमोर निर्माण झाले आहे.

**5 राज्यांना विशेष दर्जा देण्याची मागणी**

विकासाच्या बाबतीत मागासलेली राज्य विशेष दर्जा देण्याची व अतिरिक्त आर्थिक मदत करण्याची मागणी करीत आहेत. मात्र राज्यांना विशेष दर्जा देण्याच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण होतात. एखाद्या राज्याला विशेष दर्जा दिल्यास इतर राज्य देखील अशी मागणी करू शकतात. असे प्रश्न निर्माण होऊ नयेत यासाठी सरकार समोर समतोल औद्योगिक विकास करण्याबरोबरच परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

**6 स्थलांतर**

देशात प्रादेशिक असमतोलामुळे काही राज्यात रोजगार संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेल्या आहेत तर काही राज्यात रोजगार संधी मर्यादित आहेत. त्यामुळे मागास राज्यातील कामगारांचे रोजगार मिळविण्यासाठी प्रगत राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे. त्यामुळे शहरी समस्यांमध्ये वाढ होत आहे. हे टाळण्यासाठी मागास राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण करून स्थलांतर रोखण्याचे आव्हान देशासमोर आहे.

**7 शहरी समस्यांची सोडवणूक**

देशात वाढत्या लोकसंख्येबरोबरच शहरीकरण्यातही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. शहरी लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे या वाढत्या लोकसंख्येला विविध प्रकारच्या सेवा व सुविधा पुरविण्याच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. उदाहरणार्थ वीज पुरवठा दळणवळण, पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षण इत्यादी. त्याबरोबरच शहरांमध्ये सांडपाण्याचा प्रश्न देखील गंभीर स्वरूपाचा

झाला आहे. अशा अनेक शहरी समस्यांची सोडवणूक करणे व शहरी जीवनमान सुरळीत ठेवण्याचे आव्हान देशासमोर आहे.

### 3.3.3 वित्तपुरवठा (Finance)

उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी या क्षेत्राला वित्त पुरवठा उपलब्ध होणे आवश्यक असते. सर्व उद्योगांना अल्पमुदतीच्या व दीर्घ मुदतीच्या वित्तपुरवठाची गरज असते. कामगारांचे वेतन, कच्च्या मालाची खरेदी, विक्रीखर्च तसेच इतर कारणांसाठी उद्योजकांना अल्पमुदतीच्या वित्तपुरवठा ची आवश्यकता असते. त्याचबरोबर मोठ-मोठ्या यंत्रसामग्रीची खरेदी. इमारत बांधणी इत्यादी कारणांसाठी दीर्घमुदतीच्या वित्तपुरवठाची गरज असते. त्यामुळे दीर्घकालीन व अल्पकालीन वित्तपुरवठा सातत्याने व पुरेशा प्रमाणात निर्माण होण्यासाठी देशात भांडवल बाजार व नाणे बाजाराचा विकास होण्याची आवश्यकता आहे.

**वित्तपुरवठाच्या बाबतीतील आव्हाने**

भारतासारख्या विकसनशील देशात अल्प व दीर्घ मुदतीचे पुरेशा प्रमाणात व योग्य व्याजदराने भांडवल उपलब्ध होण्याच्या बाबतीत मोठे आव्हान आहे. भारतातील उद्योग क्षेत्राला वित्तपुरवठाच्या बाबतीत पुढील आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

**1 वित्तीय बाजाराचा विकास**

वित्तीय बाजारात नाणे बाजार व भांडवल बाजाराचा समावेश होतो. प्रगत व कार्यक्षम नाणे बाजार व भांडवल बाजार अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी आवश्यक असतात. परंतु भारतासारख्या विकसनशील देशात वित्तीय बाजाराचा आवश्यक तेवढा विकास झाला नसल्यामुळे लोकांच्या बचतीचा गुंतवणुकीसाठी पुरेशा प्रमाणात वापर होत नाही. त्यामुळे औद्योगिक वित्त पुरवठ्यात वाढ करण्यासाठी वित्तीय बाजाराचा पुरेशा प्रमाणात विकास करणे आवश्यक आहे.

**2 ग्रामीण भागात अपुरा औद्योगिक वित्त पुरवठा**

ग्रामीण भागातून शहराकडे होणारे लोकसंख्येचे स्थलांतर रोखण्यासाठी ग्रामीण भागातील उद्योगांना जिवंत ठेवणे आवश्यक आहे. मात्र ग्रामीण भागातील उद्योगांना वित्तपुरवठाच्या बाबतीत अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ग्रामीण भागात वित्तीय संस्थांचा विस्तार अपुरा असल्याने त्याबरोबरच ग्रामीण भागातील उद्योगांना शहरातील मोठ्या उद्योगांच्या तुलनेत कमी पसंती मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात वित्तीय संस्थांचा विस्तार करून पुरेशा प्रमाणात ग्रामीण उद्योगांना वित्तपुरवठा करण्याचे आव्हान आहे.

**3 वित्तपुरवठ्याचा स्त्रोतांचे विविधीकरण**

देशात औद्योगिक करण्याच्या प्रक्रियेला वेग मिळवून देण्यासाठी उद्योग क्षेत्राला वित्त पुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थांचे विविधीकरण करणे अतिशय आवश्यक आहे. अस्तित्वात असणाऱ्या विविध औद्योगिक वित्तीय संस्था, प्रादेशिक व सहकारी बँका इत्यादींचा विस्तार करणे तसेच नवीन संस्था निर्माण करून वित्तपुरवठा पुरेशा प्रमाणात पुरविणे आवश्यक आहे.

**4 परकीय भांडवल**

देशातील भांडवलाची मागणी व भांडवलाची उपलब्धता यात अंतर निर्माण झाले आहे. भांडवलाच्या मागणीनुसार भांडवलाची उपलब्धता करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे देशातील भांडवलाची कमतरता लक्षात घेऊन परकीय भांडवलास सुलभ प्रवेश मिळवून देणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

**5 बिगर बँकिंग वित्तीय संस्था**

विमा कंपन्या, पेन्शन कंपन्या, मर्चंट बँकिंग कंपन्या इत्यादी प्रकारच्या गैर बँकिंग वित्तीय संस्थांमध्ये मूलभूत बदल करून त्याद्वारे देखील औद्योगिक वित्त पुरवठा केला जाऊ शकतो. त्यामुळे अशा संस्थांमध्ये मूलभूत बदल करणे, त्यांना कायद्याच्या चौकटीत बसविणे व त्यातून वित्तपुरवठा करण्याचे मोठे आव्हान आहे.

**6 लघुउद्योगांची भांडवली गरज भागविणे**

देशातील ग्रामीण तसेच शहरी भागात मोठ्या प्रमाणात लघुउद्योगांच्या माध्यमातून उत्पादन होत आहे. मात्र या लघुउद्योगांना वित्तपुरवठ्याचा कमतरतेला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे लघुउद्योगांच्या भांडवलाची गरज भागविण्याचे आव्हान आहे.

### 3.3.4 तंत्रज्ञान (Technology)

विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी भांडवलाबरोबरच तंत्रज्ञान हा घटक देखील अत्यंत महत्त्वाचा आहे. विकसित देशांच्या आर्थिक विकासामागील प्रमुख कारण म्हणजे त्या देशातील तांत्रिक प्रगती हे होय.

उत्पादनासाठी दोन प्रकारचे तंत्र वापरले जाते

**1 श्रमप्रधान तंत्र :** “श्रमप्रधान तंत्र म्हणजे उत्पादनासाठी जास्तीत जास्त श्रमिक व कमीत कमी भांडवल (यंत्र) यांचा वापर करणे होय.”

**2 भांडवलप्रधान तंत्र :** “भांडवलप्रधान तंत्र म्हणजे उत्पादनासाठी जास्तीत-जास्त भांडवल (यंत्रे) व कमीत-कमी श्रम यांचा वापर करणे होय.”

भारतात अलीकडील काळात उद्योग क्षेत्र वेगाने विस्तारत आहे व त्याबरोबरच उत्पादन पद्धतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर देखील वाढत चालला आहे. परंतु असे असले तरी भारतासारख्या विकसनशील देशात तंत्रज्ञानाच्या वापराबाबत काही समस्या व आव्हानांना उद्योग क्षेत्राला तोंड द्यावे लागत आहे.

**तंत्रज्ञानविषयक आव्हाने**

देशातील उद्योग क्षेत्राला पुढील तंत्रज्ञांविषयक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

**1 आधुनिकीकरण किंवा वाजवीकरण**

उद्योजक उत्पादन व उत्पादनाच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी जुन्या व पारंपारिक तंत्रज्ञानाऐवजी नवीन व आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करतात यालाच आधुनिकीकरण असे म्हणतात. उद्योगांमध्ये उद्योजक जेव्हा आधुनिकीकरणाचा मार्ग स्वीकारतो तेव्हा श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर कमी केला जातो व भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा वापर वाढतो. उत्पादन कार्यात यंत्राचा वापर वाढल्याने बऱ्याच कामगारांना बेकार व्हावे लागते. म्हणजेच आधुनिकीकरणामुळे कामगारांच्या बेरोजगारीत वाढ होते. त्यामुळे सहाजिकच उद्योजकांच्या अशा आधुनिकीकरणाला कामगारांकडून व त्यांच्या संघटनांकडून विरोध होतो. अशा समस्या सोडवून आधुनिकीकरण करण्याचे आव्हान उद्योग क्षेत्रासमोर आहे.

**2 अपुऱ्या प्रशिक्षण सुविधा**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रशिक्षित व कुशल तंत्रज्ञांची आवश्यकता असते. मात्र देशात आधुनिक तंत्राच्या वापराबाबत प्रशिक्षण सुविधांची कमतरता दिसून येते. त्यामुळे प्रगत व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या बाबतीत आव्हान निर्माण होते.

**3 श्रमप्रधान तंत्राचा अवलंब**

भारतात काही क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात असला तरी श्रमाचे उपलब्धता व लघु उद्योगांची संख्या लक्षात घेता अजूनही मोठ्या प्रमाणात श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जातो. तसेच भांडवलप्रधान उत्पादन तंत्र हे श्रमप्रधान उत्पादन तंत्राच्या तुलनेत अधिक खर्चिक व महागडे आहे. त्यामुळे भांडवलप्रधान तंत्राच्या वापरावर मर्यादा येतात. त्यामुळे भांडवलप्रधान तंत्राचा वापर वाढविण्याचे आव्हान उद्योग क्षेत्रासमोर आहे.

**4 कुशल श्रमाचा अभाव**

भारतातील उद्योगक्षेत्रासमोर भांडवलाची कमतरता व त्याबरोबरच कुशल श्रमिकांचा आभाव यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराच्या बाबतीत अडथळे आलेले आहेत. देशातील उच्च शिक्षण

संस्थांकडून दिले जाणारे शिक्षण व उद्योग क्षेत्रातील रोजगार संधी यांच्यात ताळमेळ नसल्यामुळे उद्योग क्षेत्राला अकुशल कामगारांना प्रशिक्षण द्यावे लागते व प्रशिक्षणावर मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे अशा कामगारांना प्रशिक्षित करून आधुनिक तंत्राचा अवलंब करण्याचे आव्हान या क्षेत्रात पुढे आहे.

**5 संशोधनावर भर**

अलीकडील काळात स्पर्धेचे स्वरूप झपाट्याने बदलत चालले आहे व त्याबरोबरच ग्राहकांच्या आवडीनिवडी बदल होऊन मागणीची विविधता निर्माण झाली आहे. त्यामुळे स्पर्धेत टिकून राहण्यासाठी व ग्राहकांची पसंती मिळविण्यासाठी उद्योजकांना आपल्या उद्योगाच्या पातळीवर संशोधनावर भर देऊन आधुनिक बदल स्वीकारणे आवश्यक झाले आहे. मात्र उद्योगांमध्ये अपुरा वित्तपुरवठा, कुशल मनुष्यबळाची कमतरता, संशोधन सुविधांची कमतरता इत्यादीमुळे संशोधनाचा वेग कमी आहे. त्यामुळे संशोधनाचा वेग वाढवून आधुनिकीकरण करण्याचे आव्हान उद्योगक्षेत्र समोर आहे.

**6 योग्य परकीय तंत्रज्ञानाची आयात**

देशातील बेरोजगारीचे प्रमाण, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता, भांडवलाची उपलब्धता तसेच बाजारपेठेची उपलब्धता या सर्व गोष्टींचा विचार करून तंत्रज्ञानाची निवड करणे आवश्यक असते. जेव्हा परकीय तंत्रज्ञानाची आयात केली जाते तेव्हा प्रशिक्षणासाठी कुशल तंत्रज्ञांची देखील आवश्यकता असते. त्यामुळे महागडे परकीय तंत्रज्ञान व त्याच्या प्रशिक्षणावरील खर्च यांचा विचार करून परकीय तंत्रज्ञान आयात करण्याचे आव्हान उद्योगासमोर उभे राहते.

## 3.4 सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम: व्याख्या आणि भूमिका (Micro, Small and Medium Enterprises (MSME)- Definition and Role)

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राला भारतीय औद्योगिक क्षेत्रात अतिशय महत्वाचे स्थान आहे. कारण हे एक परिवर्तनशील व गतिमान क्षेत्र आहे. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र देशात उद्योजकतेच्या विकासाबरोबरच मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याचे कार्य करते.


**सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या व्याख्या: (Micro, Small and Medium Enterprises (MSME)- Definition)**

लघुउद्योग क्षेत्राचे भारतीय औद्योगिक क्षेत्रातील महत्त्व व योगदान ओळखून या क्षेत्राचे व्याख्या व व्याप्ती विस्तारण्याचा 2006 मध्ये निर्णय घेण्यात आला. त्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम, 2006 हा कायदा संमत करण्यात आला व 2 ऑक्टोबर 2006 पासून हा कायदा लागू करण्यात आला. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम, 2006 नुसार पूर्वीची उद्योग ही संकल्पना वगळून त्याऐवजी उपक्रम ही संकल्पना स्वीकारण्यात आली. त्यानुसार उपक्रमांची सर्वसाधारणपणे दोन मुख्य प्रकारात विभागणी करण्यात आली

1 वस्तू उत्पादक उपक्रम.

2 सेवा उपक्रम.

वरील दोन्ही प्रकारातील उपक्रमांची गुंतवणुकीच्या आधारावर सुक्षम उपक्रम, लघु उपक्रम व मध्यम उपक्रम अशा आणखी तीन प्रकारात विभागणी करण्यात आली.




| | | |
|---|---|---|
| 25 लाख रुपयांपर्यंत | ⇦ सुक्ष्म ⇨ | 10 लाख रुपयांपर्यंत |
| 25 लाख ते 5 कोटी रुपयांपर्यंत | ⇦ लघु ⇨ | 10 लाख ते 2 कोटी रुपयांपर्यंत |
| 5 कोटी ते 10 कोटी रुपयांपर्यंत | ⇦ मध्यम ⇨ | 2 कोटी ते 5 कोटी रुपयांपर्यंत |

वरील वर्गीकरणानुसार प्रकल्प व यंत्रसामग्रीतील गुंतवणूक मर्यादेनुसार वस्तू उत्पादक सूक्ष्म उपक्रम म्हणजे 25 लाख रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणूक असलेले उपक्रम होय. लघु उपक्रम म्हणजे 25 लाख ते 5 कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणूक असलेले उपक्रम होय, तर 5 कोटी ते 10 कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक असलेले उपक्रम म्हणजे मध्यम उपक्रम होय.

साधनसामग्री तील गुंतवणूक मर्यादेनुसार सेवा पुरविणारे सूक्ष्म उपक्रम म्हणजे 10 लाख रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणूक असलेले उपक्रम होय, 10 लाख ते 2 कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक असलेले उपक्रम म्हणजे लघू उपक्रम, तर 2 कोटी ते 5 कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक असलेले उपक्रम म्हणजे मध्यम उपक्रम होय.

भारत सरकारने जुलै, 2018 मध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास विधेयक, 2018 लोकसभेत मांडले. या विधेयकामध्ये सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या व्याख्येत व व्याप्तीत पुन्हा बदल करण्याची तरतूद करण्यात आली. या विधेयकामध्ये वस्तू उत्पादक उपक्रम व सेवा उत्पादक उपक्रम या दोन्हींसाठी सारखीच संकल्पना स्वीकारण्यात आली. तसेच प्रकल्प व यंत्रसामग्री येथील गुंतवणूक मर्यादा ऐवजी उपक्रमांच्या वार्षिक उलाढालीची संकल्पना स्वीकारण्यात आली.

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास विधेयक 2018 नुसार,

**सुक्ष्म उपक्रम** ⟹ 5 कोटींपेक्षा कमी वार्षिक उलाढाल

**लघु उपक्रम** ⟹ 5 कोटी ते 75 कोटी रुपयांपर्यंत वार्षिक उलाढाल

**मध्यम उपक्रम** ⟹ 75 कोटी ते 250 कोटी रुपयांपर्यंत वार्षिक उलाढाल.

**सुक्ष्म लघु व मध्यम उपक्रमांची भूमिका (Role of Micro, Small and Medium Enterprises)**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र उद्योजकतेच्या विकासाबरोबरच लाखो लोकांना रोजगार संधी उपलब्ध करून देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राची भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**1 देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान**

भारतीय अर्थव्यवस्थेत सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण या क्षेत्राचे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात सुमारे 29 टक्के योगदान आहे. ग्रामीण व शहरी भागातील सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. मोठ्या उद्योगांच्या तुलनेत कमी भांडवलात व अल्पावधीत असे उपक्रम उभारता येतात. त्यामुळे सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या माध्यमातून वस्तू व सेवांची वाढलेली मागणी कमी कालावधीत पूर्ण करणे शक्य होते.

**2 कारखानदारी क्षेत्राच्या उत्पादनात मोठे योगदान**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची सर्वसाधारणपणे वस्तू उत्पादक उपक्रम म्हणजेच कारखानदारी उपक्रम आणि सेवा उत्पादक उपक्रम अशा दोन मुख्य प्रकारात विभागणी करण्यात आली आहे. देशाच्या एकूण कारखानदारी क्षेत्राच्या उत्पादनात सूक्ष्म, लघु व मध्यम क्षेत्राचे योगदान सुमारे 45 टक्के इतके आहे.

**3 निर्यात वाढ**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमातून तयार झालेल्या विविध प्रकारच्या वस्तूंचे विविध देशांमध्ये निर्यात केली जाते. अलीकडील काळात या उपक्रमांतून तयार वस्तूंच्या निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आकडेवारीचा विचार केला असता देशाच्या एकूण निर्यातीत सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचा वाटा सुमारे 40 टक्के इतका आहे.

**4 रोजगार निर्मितीत वाढ**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र स्वयंरोजगारासाठी तसेच मजुरी रोजगारासाठी उत्तम संधी निर्माण करून देते. श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने शेती क्षेत्राखालोखाल सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत. 2015-16 च्या आकडेवारीनुसार ग्रामीण व शहरी भागात मिळवून 1109.8 लाख लोकांना सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध झाला आहे.

**5 नवीन उद्योजकांना संधी**

भारताचे राष्ट्रीय उत्पन्न व लोकसंख्या विचारात घेतली असता देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न कमी आहे. त्यामुळे देशातील बचतीचे व भांडवल निर्मितीचे प्रमाण देखील कमी आहे. नवीन उद्योजकांना भांडवल कमतरतेमुळे व्यवसाय सुरू करण्याच्या बाबतीत अडचण येते. परंतु सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अल्प भांडवली गुंतवणुकीत सुरू करता येतात. त्यामुळे नवीन उद्योजकांना हे उपक्रम संधी निर्माण करून देतात आणि म्हणूनच देशात औद्योगिकरणाच्या वेगात वाढ झाली आहे.

**6 कमी कालावधीत उत्पादन करणे शक्य**

मोठे उद्योग उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. मोठे उद्योग उभारणीसाठी कालावधीदेखील जास्त लागतो. त्यामुळे मोठ्या उद्योगातून उत्पादन सुरू होण्यास वेळ लागतो. परंतु मोठ्या उद्योगांच्या तुलनेत सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कमी गुंतवणुकीत कमी कालावधीत सुरू होतात, त्यामुळे या उपक्रमांच्या माध्यमातून वाढलेली उपभोग्य वस्तू व सेवांची मागणी कमी कालावधीत उत्पादन करून पूर्ण करणे शक्य झाले आहे.

**7 आर्थिक विषमता कमी**

मोठ्या उद्योगांच्या माध्यमातून देशातील काही व्यक्तींच्या हाती होणारे उत्पन्नाचे केंद्रीकरण सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या साहयाने कमी करणे शक्य झाले आहे. कारण छोट्या छोट्या उद्योजकांकडे अशा सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचे मालकी असल्याने त्यांना उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्त्रोत उपलब्ध झाला आहे. तसेच श्रमप्रधान तंत्राच्या वापरामुळे या उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून देशात आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

**8 साधनसामग्रीचा वापर शक्य**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम देशभरात विखुरलेले असल्याने त्या त्या भागातील साधनसामग्रीचा कार्यक्षम व पुरेपूर वापर करणे शक्य झाले आहे. मोठ्या उद्योगांचे केंद्रीकरण शहरी भागात झाल्याने स्थानिक साधनसामग्रीच्या वापरावर मर्यादा आल्या होत्या. परंतु सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांकडून उत्पादक कार्यात स्थानिक भागातील साधनसामग्रीचा वापर केला जात आहे.

**3.5 भारतीय उद्योगांच्या बाबतीतील अलीकडील काळातील प्रवृत्ती (Recent trends in Indian Industry- Indian Multinationals and New Policies)**

**भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्या**

भांडवली गुंतवणूक वाढवून देशाचा जलद आर्थिक विकास करण्याच्या हेतूने विकसनशील देशांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या देशात प्रवेश दिला आहे. विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी विदेशी भांडवली गुंतवणूक महत्त्वाची मानली जाते. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रत्यक्ष भांडवली गुंतवणूक करून विविध देशात आपल्या शाखा स्थापन केल्या आहेत. सध्या बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे जागतिक व्यापार आणि अर्थव्यवस्थांचा विकास होत आहे.

**व्याख्या**:

1 **आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या मते,** “बहुराष्ट्रीय कंपनी अशी व्यवसाय संस्था किंवा उद्योग असतो की ज्याचे व्यवस्थापनाचे मुख्यालय एका देशात (स्वदेशात) असते, मात्र अशी कंपनी इतर अनेक देशात कार्यरत असते.”

2 “बहुराष्ट्रीय कंपनी ही अशी व्यवसाय संस्था असते की, जी एकापेक्षा जास्त देशांमध्ये कार्यरत असते.”

जागतिक व्यवहाराचे केंद्र म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्यांना ओळखले जाते. व्यवसायाच्या सुरुवातीस ही कंपनी बहुराष्ट्रीय म्हणून ओळखले जाते. परंतु जसेजसे कंपनीचे व्यवहार वाढत जातात तसतसे त्या संस्थेला जागतिक स्वरूप प्राप्त होते.

**बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्गीकरण**

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्गीकरण करण्यासाठी त्या कंपन्यांकडून केली जाणारी कार्य, कंपनीची गुंतवणूक, उलाढाल, नियंत्रण, उत्पादन इत्यादी गोष्टी विचारात घेतल्या जातात. बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून केली जाणारी कार्य विचारात घेऊन कंपन्यांचे वर्गीकरण तीन गटात केले जाते.

**1 बहुराष्ट्रीय उत्पादक कंपन्या:** “ज्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या एकूण महसूलापैकी 50 टक्क्यापेक्षा अधिक महसूल उत्पादक कार्यापासून प्राप्त होतो अशा कंपन्या बहुराष्ट्रीय उत्पादक कंपन्या म्हणून ओळखल्या जातात.”

**2 बहुराष्ट्रीय सेवा कंपन्या:** “ज्या कंपन्यांच्या एकूण महसूलापैकी 50 टक्क्यापेक्षा अधिक महसूल पुरविलेल्या सेवा पासून प्राप्त होतो त्या कंपन्या बहुराष्ट्रीय सेवा कंपन्या म्हणून ओळखल्या जातात.”

**3 बहुराष्ट्रीय व्यापारी कंपन्या**: "बहुराष्ट्रीय व्यापारी कंपन्या म्हणजे अशा कंपन्या की यांच्या एकूण महसूलापैकी 50 टक्क्यांपेक्षा अधिक महसूल व्यापारापासून प्राप्त होतो."

**बहुराष्ट्रीय कंपन्यांची वैशिष्ट्ये**

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

**1 अल्प विक्रेताधिकाराचे स्वरूप**

बहुराष्ट्रीय कंपन्या आधुनिक तंत्राचा वापर, व्यवस्थापनात कौशल्य, विलीनीकरण, वस्तू भेद तसेच जाहिरातीचा वापर करतात. त्यामुळे त्यांना अल्प विक्रेताधिकाराचे स्वरूप प्राप्त होते. विलीनीकरणातून त्या प्रभावी व शक्तिमान संघटना बनतात. त्यामुळे त्यांना अल्प विक्रेताधिकाराचे लाभ मिळतात.

**2 व्यवहारांचे आंतरराष्ट्रीय स्वरूप**

बहुराष्ट्रीय कंपनीचे मुख्यालय स्वदेशात असते मात्र शाखा इतर अनेक देशात असतात. कंपनीचे व्यवहार अनेक देशात असतात त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या जगात सतत नवनवीन संधीचा शोध घेत असतात.

**3 मोठ्या आकाराचा लाभ**

बहुराष्ट्रीय कंपन्या आकारमानाने मोठ्या असतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूक क्षमता व विक्री मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यांचा जागतिक आर्थिक व्यवहारावर अधिक प्रभाव असतो. तंत्रज्ञान व इतर अनुकूलतामुळे या कंपन्यांना मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ मिळतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना अनेक देशात गुंतवणुकीच्या अनेक संधी निर्माण झालेल्या आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांची गुंतवणूक क्षमता जास्त असल्यामुळे त्यांना मिळणारे लाभ देखील मोठे आहेत. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा जागतिक आर्थिक व्यवहारावर मोठा प्रभाव निर्माण झाला आहे.

**4 स्थानिक पालक कंपनी चे महत्व**

बहुराष्ट्रीय कंपनीचे मुख्यालय स्वदेशात असते तर शाखा विविध देशात असतात वेगवेगळ्या देशात कार्यरत असणाऱ्या विविध शाखांमध्ये नवीन गुंतवणूक करण्यासंबंधीचे किंवा इतर महत्त्वाचे निर्णय स्वदेशातील स्थानिक पालक कंपनी घेते. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विविध शाखांत स्थानिक पालक कंपनी चे महत्त्व मोठे असते.

5 बहुराष्ट्रीय कंपन्यातील व्यवस्थापन मंडळातील बहुसंख्य सदस्य हे स्वदेशातील असतात.

6 बहुराष्ट्रीय कंपनीच्या भांडवली संपत्तीत स्वदेशी नागरिकांचा मोठा वाटा असतो.

7 बहुराष्ट्रीय कंपन्या विविध देशात कार्यरत असल्याने नवीन तंत्रज्ञानाची ओळख होऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढीस लागतो.

**भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका किंवा महत्त्व**

बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका किंवा महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**1 गुंतवणुकीत भांडवली भर**

बहुराष्ट्रीय कंपन्यांची वित्तीय गुंतवणूक क्षमता मोठी असल्याने अल्प विकसित व विकसनशील देशात भांडवली गुंतवणूक करून त्या देशाच्या गुंतवणुकीत भर टाकतात. त्यामुळे अशा देशांच्या भांडवली गुंतवणुकीत वाढ घडून येते.

**2 कर्जेतर भांडवली प्रवाह**

विकसनशील देशांना देशातील आर्थिक विकासाच्या योजनांना गती देण्यासाठी आवश्यक असणारी साधन-सामग्री अपुरी पडते. त्यासाठी त्यांना कर्जे उभारावी लागतात. परंतु बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून होणाऱ्या गुंतवणुकीमुळे देशात कर्जेतर भांडवली प्रवाह वाढतो. त्याचा अशा देशांना मोठ्या प्रमाणात फायदा होतो.

**3 तंत्रज्ञान हस्तांतरण**

विकसनशील देशात उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून होते. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका महत्त्वाची ठरते.

**4 निर्यात प्रोत्साहन**

देशातील बहुराष्ट्रीय कंपन्या विविध देशातील उत्पादन प्रक्रियेशी संलग्नित असतात. तसेच जागतिक बाजाराशी जोडलेल्या असतात. कार्यक्षम उत्पादन पद्धतीचा वापर करून कमी खर्चात उत्पादन करणे व त्यांची वेगवेगळ्या देशात निर्यात करण्यावर बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विशेष भर असल्यामुळे देशाच्या निर्यातीत वाढ घडून येते.

**5 रोजगार निर्मिती**

भारतातील बेरोजगारी ही एक मोठी समस्या आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून होणारी रोजगार निर्मिती काही प्रमाणात देशातील बेरोजगारीची समस्या कमी करण्यास साहाय्यभूत ठरली आहे. त्यामुळे देशात रोजगार निर्मिती करून देशातील बेरोजगारी निर्मूलनाच्या दृष्टीने देखील बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका महत्त्वाची आहे.

**6 व्यवहारतोल**

बहुराष्ट्रीय कंपन्या जेव्हा एखाद्या देशात पदार्पण करतात तेव्हा सोबत भांडवल, तंत्रज्ञान, तंत्रज्ञ, व्यवस्थापक आणतात. त्यामुळे अशा घटकांच्या आयातीवरील देशाचा खर्च कमी होतो. बहुराष्ट्रीय कंपन्यामुळे बऱ्याच वस्तूंचे उत्पादन देशात होऊ लागते, त्यांची आयात कमी होते. उत्पादनात वाढ घडून आल्याने निर्यातीत वाढ होऊ लागते. निर्यातीत वाढ व आयातीत घट घडून आल्यामुळे व्यवहारतोलातील तूट कमी होण्यास मदत होते.

**7 जोखीम उचलण्यातील भूमिका**

प्रगत तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, प्रचंड वित्तीय क्षमता, कुशल तंत्रज्ञ आणि व्यवस्थापन यांचा मोठा ताफा बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे असतो. त्यांच्याकडे मोठा अनुभव असतो. या सर्व प्रकारच्या सामर्थ्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या जोखीम समर्थपणे पेलतात. देशातील उद्योगांमध्ये एवढी क्षमता नसल्याने ते जोखीम उचलण्यात मागे राहतात.

**8 संशोधन आणि विकासातील भूमिका**

नवप्रवर्तनासाठी संशोधन आणि विकास आवश्यक असतो. यासाठी प्रचंड भांडवलाची आवश्यकता असल्याने एवढी क्षमता राष्ट्रीय कंपन्यांकडे नसते. त्यामुळे नवीन संशोधन व नवप्रवर्तन यावर मर्यादा येतात. मात्र बहुराष्ट्रीय कंपन्या संशोधन आणि विकास करून विकसनशील देशांच्या विकासाला हातभार लावतात.

**नवीन धोरणे (New Policies)**

1991 मध्ये भारत सरकारने नवीन आर्थिक सुधारणा स्वीकारल्या. 1991 नंतर भारत सरकारने विदेशी भांडवल आकर्षित करण्यासाठी काही विशेष धोरणात्मक बदल केल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रवेश सुलभ झाला आहे. हे धोरणात्मक बदल पुढीलप्रमाणे आहेत.

**1 औद्योगिक परवाना पद्धतीत बदल**

1991 च्या औद्योगिक परवाना धोरणानुसार महत्त्वाचे 18 उद्योग सोडून इतर सर्व उद्योग परवाना मुक्त करण्यात आले. या धोरणाने जवळजवळ 85% उद्योगक्षेत्र परवाना मुक्त केले. म्हणजे सुरुवातीला केवळ 18 उद्योगांसाठीच परवान्याची अट होती नंतर ही संख्या क्रमाक्रमाने कमी करण्यात येऊन सध्या केवळ पाच उद्योगांसाठीच परवाना आवश्यक आहे.

**2 MRTP कायद्यात बदल**

MRTP Act 1969 ने शंभर कोटींपेक्षा अधिक उलाढाल असणाऱ्या कंपन्यांच्या नवीन गुंतवणुकीवर अनेक बंधने टाकली होती. मात्र 1991 च्या औद्योगिक धोरणांतर्गत शंभर कोटींची ही मर्यादा रद्द करण्यात आली व कंपन्यांच्या विस्ताराला अनुकूल वातावरण तयार करून देण्यात आले.

**3 तंत्रज्ञान आयातीचे उदार धोरण**

1991 च्या नवीन आर्थिक सुधारणा नंतर नवीन तंत्रज्ञान, भांडवली वस्तू इत्यादींच्या संदर्भातील धोरण आणि पद्धतीमध्ये शिथिलता आणण्यात आली. त्यामुळे तंत्रज्ञानाचा प्रवाह वाढून औद्योगिकरणाला गती प्राप्त झाली.

**4 परकीय गुंतवणुकीस मान्यता**

नवीन धोरणाच्या माध्यमातून आस्तीत्वातील कंपन्यांना विदेशी भांडवल गुंतवणूक 51 टक्क्यांपर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात आली. त्यामुळे परकीय गुंतवणुकीत वाढ होऊन देशात गुंतवणुकीत वाढ घडून आली.

**5 FERA कायद्यात बदल**

नवीन आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेत FERA कायद्यातील तरतुदी रद्द करण्यात आल्या. त्यामुळे एखाद्या कंपनीतील विदेशी गुंतवणुकीचे प्रमाण जरी 40 टक्केपेक्षा अधिक असले, तरी ती कंपनी भारतीय कंपनीप्रमाणे कार्यरत राहू शकते.

**6 ट्रेडमार्क वापरण्यास संमती**

विदेशी कंपन्यांना त्यांच्या देशाचा ट्रेडमार्क म्हणजेच व्यापारी बोधचिन्ह स्वदेशी बाजारपेठेत वापरण्यास संमती देण्यात आली.

## प्रश्नावली

❖ **व्याख्या लिहा**

1. औद्योगिक धोरणाचा अर्थ सांगा.
2. बहुराष्ट्रीय कंपन्यांची व्याख्या लिहा.
3. प्रादेशिक असमतोल म्हणजे काय?
4. उदारीकरणाचा अर्थ सांगा.
5. खाजगीकरण म्हणजे काय?

6. जागतिकीकरणाची व्याख्या लिहा.
7. सुक्ष्म उपक्रमाची व्याख्या लिहा.
8. लघु उपक्रमाची व्याख्या लिहा.
9. मध्यम उपक्रमाची व्याख्या लिहा.

❖ **लघुत्तरी प्रश्न**

1. उदारीकरणाचा अर्थ स्पष्ट करा.
2. खाजगीकरणाचा अर्थ स्पष्ट करा.
3. जागतिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करा.
4. वित्तपुरवठ्याचे प्रमुख स्त्रोत सांगा.
5. बहुराष्ट्रीय कंपन्यांची वैशिष्ट्ये सांगा.

❖ **दीर्घोत्तरी प्रश्न**

1. भारताच्या आर्थिक विकासातील उद्योग क्षेत्राची भूमिका स्पष्ट करा.
2. औद्योगिक धोरण 1991 ची वैशिष्टे स्पष्ट करा.
3. भारतीय उद्योग क्षेत्रापुढील कामगार व रोजगार संबंधित आव्हाने स्पष्ट करा.
4. भारतीय उद्योगापुढील प्रादेशिक असमतोलाबाबतची आव्हाने स्पष्ट करा.
5. भारतीय उद्योग क्षेत्रापुढील वित्तपुरवठ्याच्या बाबतची आव्हाने स्पष्ट करा.
6. भारतीय उद्योग क्षेत्रा समोरील तंत्रज्ञान विषयक आव्हाने स्पष्ट करा.
7. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची व्याख्या सांगून भूमिका स्पष्ट करा.